दै. गोदातीर - दि. 11/08/25

# घरफोडी करणारी आंतरराज्य टोळी जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यातील मालाविरुद्धचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना आदेशीत केले होते.



त्यावरून उदय खंडेराय यांनी स्थानिक गुन्हे शाखा येथील साईनाथ पुयड व त्यांचे पथकातील अंमलदार यांना नांदेड जिल्ह्यातील मालाविरुद्धचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत आदेशीत केल्याने साईनाथ पुयड व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी दिनांक ९ ऑगस्ट रोजी आरोपी शोधकामी पथकासह रवाना झाले. उस्माननगर हद्दीत आले असता त्यांना गुप्त बातमी-दारामार्फत माहिती मिळाली की, मारतळा ते कलंबर जाणारे रोडवर दोन जण संशयीतरित्या चोरीचे सोन्या-चांदीचे दागिने विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःचे ताब्यात बाळगुन फिरत आहेत अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने नमूद माहितीवरुन सदर पथकाने तेथे जाऊन छापा टाकला असता तेथे बळीराम विश्वनाथ कुसळकर (वय ५१ वर्ष रा. अंबा नगर सांगवी नांदेड ह.मु. मारतळा खडकी परिसर) आणि राहुल रमेश मुदाळे (वय १९ वर्ष व्यवसाय मजुरी रा.संजय नगर उदगीर ता. उदगीर जि. लातूर ह.मु मारतळा खडकी परिसर) हे मिळून आले. त्यांना ताब्यात घेवून अधिक विचारपूस केली असता त्यांनी पो. स्टे. नायगाव येथील एक घरफोडी व पो. स्टे. रामतीर्थ येथील एक घरफोडी गुन्ह्यातील एक चांदीचे ब्रॉसलेट जु.वा किमती २५७० रूपये, एक चांदीचे वाळे जोड जु. वा किमती २६२० रुपये, एक चांदीचे लॉकेट जु.वा किमत १०९० रुपये, एक सोन्याची अंगठी जु. वा किमती १० हजार रुपये, एक सोन्याचे नेकलेस जु.वा किमती १ लाख ४५ हजार ५०० रुपये असे एकूण--१ लाख ६१ हजार ७८० रूपयांचा मुद्देमाल आरोपीतांच्या ताब्यात मिळून आल्याने सदर आरोपीतांना विचारपूस केली असता त्यांनी वरील गुन्हे त्यांचे इतर दोन साथीदार लक्ष्मण पवार रा. अंबानगर सांगवी नांदेड, करण ऊर्फ सिन्ना रामचंद्र मजुळे रा. दिग्रस जि. यवतमाळ यांच्यासोबत केल्याचे कबुली दिली. आरोपी क्रमांक ३ व ४ हे फरार असल्याने सदरचा मुद्देमाल आरोपी क्रमांक १ व २ यांचे कडुन जप्त करून त्यांना मुद्देमालासह पोलीस स्टेशन नायगाव येथे पुढील कायदेशीर कार्यवाही कामी ताब्यात देण्यात आले आहे.